लोकमत

# विद्यापीठात आणखी ४५० बेडचे रुग्णालय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाची रुग्णसंख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे. रुग्णालये भरली आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेतर्फे तातडीची रुग्णालये सुरु करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठ एनसीसी ऑफिसशेजारील वसतिगृहात ४५० बेड क्षमता असणारे कोरोना केअर सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

> वाढत्या रुग्णसंख्येचा विचार करुन येथे ४५० बेडचे कोरोना केअर सेंटर सुरु केले आहे. १५० बेड पहिल्या टप्प्यात होणार आहेत. यामध्ये लक्षणे नसणाऱ्या रुग्णांवर उपचार होणार आहे. ऑक्सिजन सिलिंडरसह तीन शिफ्टमध्ये येथे वैद्यकीय पथक नियुक्त करणार आहेत.
>
> **- निखिल मोरे, उपायुक्त, कोल्हापूर महापालिका**

आज शुक्रवारी त्यांपैकी १५० बेड कार्यान्वित केले जाणार आहेत.

कोल्हापूरमध्ये गेल्या १५ दिवसांत ४०० पेक्षा जास्त कोरोनाचे नवीन रुग्ण आढळून आले. यामुळे महापालिका, जिल्हा प्रशासन यांच्यावर प्रचंड ताण आला आहे. नियोजनानुसार सध्या सर्व रुग्णालये भरली आहेत.

नवीन येणारे रुग्ण, संपर्कातील नातेवाईक यांना कुठे ठेवायचे हा मोठा प्रश्न आहे. महापालिकेकडून यावर युद्धपातळीवर उपाययोजना केली जात आहे. चार दिवसांपूर्वीच शिवाजी विद्यापीठ डी ओ टी विभागात ३५० बेडचे हॉस्पिटल सुरु केले. सध्या २०० रुग्ण येथे उपचार घेत आहेत. शहरात वाढता रुग्णांची संख्या पाहता महापालिका शिवाजी विद्यापीठ एन सी सी ऑफिस परिसरातील वसतिगृहात आणखी एक रुग्णालय सुरु करीत आहे.

Kolhapur Main
Page No. 6 Jul 24, 2020
Powered by: erelego.com

# परीक्षा संचालकांच्या मुलाखती लॉकडाऊननंतरच

## शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पात्र उमेदवारांची नावे जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन संचालकपदाची जबाबदारी गेल्या वर्षभरापासून प्रभारी संचालक गजानन पळसे यांच्यावर आहे. या पदासाठी अर्ज भरलेल्यांपैकी पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे यांच्यासह सहा उमेदवार पात्र ठरले आहेत. यादी जाहीर झाली असली तरी लॉकडाऊननंतरच म्हणजे ऑगस्ट महिन्यात या पदाच्या मुलाखती होणार आहेत.



शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर ते आपल्या मूळ आस्थापनाच्यापदी रूजू झाले. विद्यापीठाने १ मार्चला परीक्षा नियंत्रक पदाची जाहीरात प्रसिध्द केली होती. ५ एप्रिलपर्यंत ऑनलाईन तर १५ एप्रिलपर्यंत ऑफलाईन अर्ज पाठवण्यासाठी मुदत होती. या पदासाठी १६ उमेदवारांनी अर्ज भरले होते. मात्र छाननी प्रक्रियेनंतर यादी प्रसिध्द करण्याचे काम गेल्या वर्षभरापासून थांबले होते. आता ही यादी जाहीर करून पुन्हा या पदाच्या निवडप्रक्रियेला विद्यापीठाने सुरुवात केली आहे. यामध्ये काकडे, घाटुळे यांच्यासह सातारा येथील सुहास पाटील, सिंहगड इन्स्टिट्यूटमधील शिवाजी मुंडे, योगेश पाटील, सुजाता आडमुठे या उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

**शासनाच्या मार्गदर्शन सूचनेप्रमाणे मुलाखती**

परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक पदासाठी पात्र उमेदवारांची यादी जाहीर झाली आहे. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुलाखती घेण्यासाठी अधिकार मंडळासह शासन परवानगी घ्यावी लागेल. त्यामुळे लॉकडाऊन संपल्यानंतर शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांच्या मुलाखती कशा पध्दतीने घ्यायच्या याचा निर्णय जाहीर केला जाईल.

**डॉ. विलास नांदवडेकर (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)**

# शिवाजी विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षेबाबत परिस्थिती 'जैसे थे'

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षेबाबत अद्याप परिस्थिती 'जैसे थे' आहे. मात्र, यूजीसी व केंद्र, राज्य सरकारच्या भूमिकेमुळे विद्यार्थी, पालक संभ्रमात आहेत. विद्यापीठाच्या पदवीच्या अंतिम वर्षाच्या शेवट सत्र परीक्षा अद्याप झालेल्या नाहीत. गेल्या काही दिवसांपासून परीक्षांबाबत केंद्र, राज्य सरकार व यूजीसीकडून वेगवेगळे निर्णय घेतले जात आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ७५ हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. राज्य सरकार परीक्षा न घेण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले. ३१ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी सुनावणी होणार आहे. परीक्षेबाबतचा निर्णय होत नसल्याने विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

# शिवाजी विद्यापीठात आता कोरोना कक्ष

## मुलांच्या वसतिगृहात व्यवस्था; क्वारंटाईन सेंटर रिकामी होणार

युवराज पाटील : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २३ : कोरोना रुग्णांसाठी उपचार कक्ष कमी पडू लागल्याने शिवाजी विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहात कोरोना कक्ष सुरू करण्याचा निर्णय महापलिका प्रशासनाने घेतला आहे.**

सध्याची क्वारंटाईन सेंटर रिकामी करून सुमारे साडेचारशे इतक्या बेडची व्यवस्था वसतिगृहात केली जाणार आहे.

विद्यापीठातील वसतिगृहात क्वारंटाईनची व्यवस्था होती. मात्र रुग्णांची संख्या वाढू लागल्याने उपचारात हयगय होऊ नये यासाठी क्वारंनटाईन सेंटर रिकामी करून तेथे कोवीड सेंटर सुरु होत आहे. शहरातील रुग्ण संख्या सुमारे साडेतीनशेवर आहे. यात आणखी वाढ होईल हे गृहीत धरून सध्या मुलांची वसतिगृहे ताब्यात घेतली जाणार आहे.

तंत्रज्ञान विभागात आता ३०० बेड होतील. रुग्ण सापडल्यानंतर त्यास हलविणे, औषधफवारणी करणे, प्रतिबंधित क्षेत्र अशा कामांचा सपाटा सुरू आहे. जे लोक त्यांच्या संपर्कात येत आहेत अशांची संख्या वाढत आहे. क्वारंटाईन सेंटरही हाउसफुल्ल आहेत.

शहरात सुमारे आठशे रुग्णांवर उपचार होतील असा प्रयत्न सुरू आहे. विद्यापीठात कोवीड सेंटर सुरु झाल्यास सीपीआर प्रशासनावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

**“महापालिका कोरोना कक्ष सुरू करीत असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, त्यासंबंधीचे लेखी पत्र अद्याप मिळालेले नाही.**
**- डॉ. विलास नांदिवडेकर,**
कुलसचिव

ज्यांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत पण त्यांच्यात सौम्य स्वरूपाची लक्षणे दिसून येत आहेत अशांवर या ठिकाणी उपचार होतील. क्वारंटाईन सेंटर सध्या हाउसफुल्ल आहेत. त्यामुळे इन्स्टिट्यूशन क्वारंनटाईनऐवजी होम क्वारंनटाईन करण्यावर भर दिला आहे.

**“कोरोना रुग्णांवर उपचार कमी पडू नयेत, यासाठी विद्यापीठात सुमारे ४५० बेडचा कोरोना कक्ष सुरू होत आहे. ज्यांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे; पण लक्षणे सौम्य आहेत अशांवर उपचार होतील.**
**- निखिल मोरे,**
उपायुक्त

# शिवाजी विद्यापीठात ४०० बेडचे कोरोना काळजी केंद्र सुरु करण्याच्या हालचाली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी वसतिगृहामध्ये ४०० बेड क्षमतेचे केव्हिड केअर सेंटर सुरू करण्याच्या हालचाली महानगरपालिकेकडून सुरू झाल्या आहेत.

विद्यापीठातील वसतिगृह ताब्यात घेण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच काढला आहे. त्यानुसार विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थी, विद्यार्थिनी



वसतिगृहे प्रशासनाने ताब्यात घेतली. याठिकाणी कोव्हिड केअर सेंटर सुरू झाले आहे. विद्यापीठातील विद्यार्थी वसतिगृह क्र. १ ते ३ ही क्वारंटाईन सेंटर म्हणून आहेत. सदस्यस्थितीत शहरात कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यापार्श्वभूमीवर महापालिकेकडून वसतिगृह क्र.३ मध्ये कोव्हिड केअर सेंटर उभारण्याची तयारी सुरू केली आहे. लवकरच या वसतिगृहाची स्वच्छता करण्यात येणार आहे. या ठिकाणी डॉक्टर्स यांच्यासह मुनष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर तत्काळ कोव्हिड केअर सेंटर सुरू केले जाईल. आवश्यकतेनुसार आणखी दोन वसतिगृहामध्येही कोव्हिड केअर सेंटर सुरू केली जाईल, अशी माहिती महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई यांनी दिली.